# मुंबई विद्यापीठ

## जाहिर प्रकटन

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे पत्र क्र. युएनआय/विद्या. अधिनियम/२०१६/बैठक/अधी-३/विशि-१/६५२९ दिनांक २ जून २०१७ च्या अनुषंगाने अकृषि विद्यापीठांच्या कुलगुरूंची विभागाच्या अन्य अधिका-यांसह आयोजित आढावा बैठक दिनांक ८ जून २०१७ रोजी सकाळी १०.३० वाजता सहयाद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली व मा. राज्यमंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे उपस्थितीत पार पडली.

सदर बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे मुंबई विद्यापीठाच्या प्राचार्य, व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि नोंदणीकृत पदवीधरांना याद्वारे कळविण्यात येते की, नावनोंदणी/मतदार यादी तयार करण्यासाठीची मुदत वाढविण्याबाबत कोणाचीही मुदत वाढीची मागणी मंजूर करता येणार नाही.

ऑनलाईन प्रक्रियेद्वारे भरलेल्या अर्जाची प्रत मुंबई विद्यापीठाच्या निवडणूक विभाग कक्ष क्र. ११०, विद्यापीठ मुख्य इमारत, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२. येथे जमा करावी अन्यथा आपला ऑनलाईन भरलेला अर्ज वैध ठरवला जाणार नाही.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रत प्रत्यक्ष येऊन विद्यापीठात जमा करू शकत नसेल त्यानी ती प्रत साधा टपाल, स्पीड पोस्ट अथवा कुरीअरने दिनांक ३० जून, २०१७ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत उपरोक्त पत्त्यावर पोहचतील या बेताने पाठवावेत आणि सहकार्य करावे.

मुंबई : ४०० ०३२.
दिनांक : १७ जून, २०१७.

कुलसचिव
(डॉ.एम.ए.खान)